पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,

**विषय** – ई-निविदा संगणक प्रणालीकरीता Digital Key च्या वापराबाबत. . .
**संदर्भ** – लेखा विभागाकडील परिपत्रक क्र. लेखा/१अ/कावि/९०४४/१७, दि. १०.१०.२०१७

# परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सर्व प्रकारच्या निविदा मागविणे व निविदा सादर करणे इत्यादी कामकाजासाठी ई-निविदा संगणक प्रणालीचा वापर करण्यात येतो. सदरच्या निविदा सादर करण्याकरीता महापालिकेतील विविध विभागांमार्फत विभागनिहाय ठेकेदार नोंदणी (Vendor Registration) करणेत येते. तसेच नोंदणीकृत ठेकेदारांना मध्यवर्ती भांडार विभागाकडील दि. २६.०७.२०१७ रोजीचे पुरवठा आदेशान्वये मे. साई असोसिएटस् यांचेमार्फत Digital Key चा पुरवठा करणेत येतो. तथापि, उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये महापालिकेच्या सर्व कामांसाठी निविदा सादर करताना निविदाधारक महापालिकेचा नोंदणीकृत ठेकेदार असणे आवश्यक नसलेबाबत कळविणेत आलेले आहे. तसेच त्याबाबत ई-निविदा संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणेकामी व निविदा सादर करणा-यांना तसेच महापालिकेच्या विभागांना माहिती उपलब्ध करून देणेबाबत कळविणेत आलेले आहे.

महापालिकेच्या ई-निविदा प्रणालीद्वारे ठेकेदारांना निविदा सादर करण्यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळाद्वारे संगणकीकृत Self-Registration करणे व त्याद्वारे निविदा सादर करण्याची सुविधा ई-निविदा प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच सद्यस्थितीत महापालिकेच्या विविध विभागांकडील निविदा प्रक्रीया सुरू असल्याने ठेकेदारांना निविदा सादर करणेस अडचण निर्माण होऊ नये या करीता सर्व नोंदणकृत ठेकेदारांची नोंदणीची मुदत वाढविणेत आलेली आहे. यापुढे ठेकेदार महापालिकेत Self-Registration करून नोंदणीकृत होत असल्याने ई-निविदा सादर करण्यासाठी त्यांना आवश्यक असलेली Class III with Organization Name Digital Key कोणत्याही Digital Key पुरवठा करणा-या Agency द्वारे (उदा. M/s. Sify Technologies, eMudra, nCode Solutions etc. ) स्व:खर्चाने उपलब्ध करून घ्यावी लागणार आहे. यापुढे महापालिकेमार्फत Digital Key चा पुरवठा करणेत येणार नाही. तसेच महापालिकेच्या अधिका-यांसाठी पुर्वी प्रमाणे महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत Digital Key उपलब्ध करून देण्यात येईल याची नोंद घेणेत यावी.

**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

**प्रति,**
**सर्व विभाग प्रमुख**

**क्र. मातं/६/कावि/६१२/२०१७**
**दिनांक १७/११ /२०१७**